VOL- IX ISSUE- VIII AUGUST 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# पर्यावरण संवर्धनात समाजाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. डी. के. कदम
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर

## Introduction:

मानवी समाजाचा विकास प्रगतीत पर्यावरणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. पर्यावरण मानवी जीवनाला पोषक असेल तर मानवी जीवन सुखी समृद्ध राहू शकते. भारतातील अनेक धर्मग्रंथात जल ;वायू ;अग्नी; जीव तसेच भूमी इत्यादीला अतिशय महत्त्वाचे स्थान देऊन त्यांची पूजा अर्चा केली जाते हे स्पष्ट दिसून येते.

प्रसिद्ध अमेरिकन समाजशास्त्रज्ञ ए .एफ .वार्ड यांनी मानव मानवेत्तर प्राणी यात भेद सांगितला. मानवाला बुद्धी आहे मानवी तर प्राण्याला बुद्धी नाही. मानवेत्तर प्राणी ही निसर्गावर मात करत नाहीत. निसर्गाने जसे ठेवले त्याप्रमाणे राहतो ऋतूप्रमाणे निसर्गात उपलब्ध अन्न खात असतो. परंतु मानव आपल्या बुद्धीचा अधिकाधिक वापर करून बुद्धीच्या जोरावर निसर्गावर मात करून आपली जीवन अधिकाधिक सुखी व संपन्न ;आरामदायी करण्यासाठी पर्यावरणाची नासाडी करण्यात मानवाचा सिंहाचा वाटा आहे.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने विसरण 1945 मध्ये हिरोशिमा व नागासाकी या जपानच्या प्रमुख शहरावर अणुबॉम्ब टाकला ; 1954 मध्ये पॅसिफिक येतील मार्शल बेटावर अमेरिकेने टाकलेला पहिला हायड्रोजन बॉम्ब ; 1956 ला जपान मध्ये मिठाई मर्क्युरीची विषबाधा ; 1965 फ्रान्स देशाने घेतलेल्या अणुचाचणी ; अमेरिकेने वापरलेला एजंट अरेंज या वनस्पती नाशक द्रव्याचा वापर ;1984 ला भारतात भूपाळीतील युनियन कार्बोराइड विषारी वायूची गळती; 1986 ला सोवियत युनियनच्या युक्रेनशेकडो इंधन विहिरींना आगी इत्यादी अशा अनेक लहान-मोठ्या अतिशय गंभीर स्वरूपाच्या धोकादायी घटना मुळे जीवसृष्टी वर परिणाम होऊन सर्व जगालाच धोका पोहोचला आहे याची जाणीव समाजाला होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

मानव स्वार्थी ; सत्ता ; संपत्ती ; निसर्गावर मात करण्याची महत्त्वकांक्षा ; नवनवीन वैज्ञानिक शोध ; वाढत्या गरजांची ;पूर्ण औद्योगिक क्रांतीचा आधार ; मोठ्या प्रमाणात जंगलतोड; मोठमोठे कारखाने; इमारती; मोठमोठ्या धरणाची निर्मिती त्यामुळे मोठमोठ्या जंगलाचा ऱ्हास ;कच्च माल ;इंधनाची गरज भागविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात बेसुमार वापर ;वाढती लोकसंख्या; औद्योगीकरण त्यामुळे नागरिकरणाच्या प्रक्रियेचा वेग त्यामुळे शहरी लोकसंख्येत वाढ; पाण्याचा अतिवापर अणुबॉम्ब रासायनिक विषारी ; अस्त्रे; वाहनाच्या संख्या वाढ इत्यादीमुळे जीवसृष्टीचा संहार सुरू झाला त्यामुळे पर्यावरण ही गंभीर स्वरूपाची समस्या निर्माण झाली आहे सर्वसामान्य माणसापासून ती राजकारणापर्यंत पर्यावरण हा चर्चेचा जिव्हाळ्याचा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय बनला आहे या पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी व पर्यावरण संतुलित राखण्यासाठी पर्यावरण संवर्धनात समाजाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे म्हणून प्रस्तुत शोध निबंधात पर्यावरण संवर्धनात समाजाची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन याचा अभ्यास केला आहे.

**अध्ययन विषयाची उद्दिष्टे :**

१) पर्यावरण नाचा सविस्तर अभ्यास करणे.

२) पर्यावरण संवर्धना त सर्वसामान्यांचा सहभाग अभ्यासणे.

३) पर्यावरण संवर्धनात समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे याचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्याचा उपयोग केला आहे. प्राथमिक तथ्य संकलनात मुलाखत द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करताना अध्ययन विषयाशी संबंधित पुस्तके; ग्रंथ ; अहवाल ; वर्तमानपत्रे; मासिके ; कार्यशाळा ; चर्चासत्र इत्यादी माहितीचा आधार घेतला आहे . अध्ययनात अन्वेषणात्मक वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब केला आहे.

**तथ्य विश्लेषण :**

पर्यावरण समस्या ही सार्वत्रिक स्वरूपाची समस्या असून ती एखाद्या देशापूर्ती मर्यादित नाही. पर्यावरण समस्या ही स्थानिक नसून जागतिक समस्या बनली आहे म्हणून इ.स. 1972 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण विषयक पहिली जागतिक परिषद सिव्हिडन मधील स्टॉक होम या शहरात संपन्न झाली. तेव्हापासून मानव पर्यावरणीय समस्याला बऱ्याच प्रमाणात महत्त्व देत असून जगात जनसंमान्य माणसात आजही पर्यावरण विषयक जेवढ्या प्रमाणात जागरूकता व्हायला पाहिजे तेवढी झालेली दिसून येत नाही .म्हणून पर्यावरण संवर्धनात समाजाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे.आज पर्यावरणाची संवर्धन व्हावे म्हणून 22 मार्च हा वन दिन; 16 सप्टेंबर हा ओझोन दिन; 22 एप्रिल हा वसुंधरा दिन ;5 जून हा जागतिक पर्यावरण दिन ;म्हणून साजरा केला जातो ;परंतु जनसामान्य पर्यंत या दिनाचे महत्त्व पोहोचलेले दिसून येत नाही हे प्राथमिक तथ्य संकलनावरून स्पष्ट होताना दिसून येते. 5 जून जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो सर्व लोकांमध्ये पर्यावरणाबद्दल एक जबाबदारीची भावना व जाणीव निर्माण व्हावी हा उदास हेतू समोर ठेवून जगातील सर्व देशात पाच जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो .सेवाभावी संस्था; शाळा ;महाविद्यालय; निसर्गप्रेमी ;पर्यावरण विभाग इत्यादी सेमिनार ;चर्चासत्रे; आयोजित करणे; दूरदर्शन; आकाशवाणी ;वर्तमानपत्रे इत्यादी पर्यावरणाचे व पर्यावरण ऱ्हास; पर्यावरणाचे महत्त्व; पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण; पर्यावरण शिक्षण ;प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रमाचा अंतर्भाव असतो पर्यावरण शिक्षणावर अगणित पैसा खर्च करण्यात येतो ;परंतु भारतात पर्यावरण संवर्धनात शिक्षण हे जास्त प्रमाणात समाजापर्यंत पोहोचले नाही; त्याचबरोबर भारतात पर्यावरण शिक्षण संबंधी जास्त प्रमाणात जनजागृती झाल्याची दिसून येत नाही.

पर्यावरण जाणीव जागृतीसाठी प्रयत्न करणे हे आज संयुक्त राष्ट्र संघाचे एक प्रमुख कार्य बनले आहे या कार्यात आज अनेक संघटना कार्यरत आहेत जसे _Green_ _Peace Society; Friends of Earth; World Wild Fund_ इत्यादी.

भारतात पर्यावरण विषयक जाणीव जागृती व्हावी हा उद्धात हेतू ठेवून अनेक मोहिमा सुरुवात केल्या त्यात चिपको आंदोलन अपिको आंदोलन शांतीघाट आंदोलन अरवली बचाव आंदोलन इत्यादी ज्यामुळे पर्यावरणाबद्दल जनमानसात जागृती निर्माण होण्यास मदत होईल . होईल परंतु जेवढी जण माणसांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती व्हायला पाहिजे तेवढी झालेली दिसून येत नाही म्हणून पर्यावरण संवर्धनामध्ये समाजाचे भूमिका वाढविणे ही अत्यंत गरजेच्या असल्याचे दिसून येते. राज्यस्थान मध्ये जलसंवर्धनासाठी श्री राजेंद्र सिंह' तरुण भारत संघ 'ही संघटना निर्माण करून लोकांमध्ये फार मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली आहे ;त्याचप्रमाणे आज प्रत्येक राज्यात अशी जनजागृती करून पर्यावरण संवर्धनामध्ये समाजाचा

सहभाग वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. आज भारतातून जवळपास दरवर्षी दहा लाख हेक्टर जंगल नष्ट होत असते. 2009 ते 2011 या दोन वर्षात 367 चौरस किलोमीटर नष्ट झाले असा शास्त्रीय अहवाल आहे ;परंतु प्रत्यक्ष मुलाखतीतून सुशिक्षित विद्यार्थी व लोकांना याविषयी कोणतीही प्रकारची जाणीव नाही मागील एका वर्षात भारतात काही प्रमुख राज्यात तोडलेली झाडे मध्य प्रदेशात 16 सोळा लाख चाळीस हजार 532 ;उत्तर प्रदेश तीन लाख 11 हजार 998 ओरिसा दोन लाख 23 हजार; 375 तेलंगणा एक लाख 73 हजार 720; महाराष्ट्रात एक लाख पंचेचाळीस हजार २९४; देशभरात 2020 21 मध्ये 30.97 लाख झाडे तोडली गेली तर 3.6 कोटी झाडे लावली यावर ३९७ कोटी रुपये खर्च झाले हा केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाचा अहवाल आहे म्हणून यावरून हे स्पष्ट होते की झाडाची तोड एवढ्या मोठ्या प्रमाणात आहे आणि लागवड यामध्ये एवढी तफावत आहे तर पर्यावरणास चा जो ऱ्हास होत आहे याकडे लक्ष देणे अतिशय महत्त्वाचे असून यासाठी पर्यावरणामध्ये जनसामान्यांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. जंगलतोडीमुळे असंख्य महापुराला आमंत्रण मिळाले आहे हिमालयातील बर्फ वितळल्यामुळे उत्तर भारतातील नद्यांना महापूर वाढले पर्यावरण विनाशामुळे सुमारे दरवर्षी 50 हजार कोटीची हानी होते याविषयीची समाजामध्ये जाणीव जागृती होणे अतिशय गरजेचे आहे. भारतातील दिल्ली हे सर्वात प्रदूषित शेअर असून महाराष्ट्रात चंद्रपूर पुण्याचा नंबर लागतो केंद्र सरकारने 124 प्रदूषित शहराची नावे जाहीर केली आहेत या शहर प्रदूषणा प्रदूषणाच्या सीमा ओलांडले आहेत या यादीमध्ये सर्वाधिक प्रदूषित शहरे असलेल्या राज्यात महाराष्ट्राचा पहिला नंबर येतो राज्यातील प्रदूषित आहेत त्यात चंद्रपूर; पुणे ;अकोला; अमरावती ;औरंगाबाद; बदलापूर ;जळगाव ;जालना; कोल्हापूर ;लातूर ;मुंबई; नवी दिल्ली; नाशिक ;नागपूर; सांगली; सोलापूर; ठाणे; उल्हासनगर या शहराचा समावेश होतो म्हणून महाराष्ट्रातील पर्यावरणाचा समस्येचा विचार केलास तर अनेकांनी ही समस्या अतिशय घातक कशी ठरते याचा विचार करणे आवश्यक आहे.

पृथ्वीवरील संपूर्ण सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी पर्यावरण किती महत्त्वपूर्ण आहे पर्यावरणाचे संतुलन टिकून राहणे किती आवश्यक आहे ;याची जाणीव पर्यावरण अभ्यासाद्वारे होत असते याची जाणीव आज समाजाला करून देणे गरजेचे आहे .पर्यावरणातील भिन्नतेनुसार निर्णयाने नैसर्गिक प्रदेशात विविध प्रकारच्या परिसंस्था विकसित झाले आहेत या परिसंस्थेचे ज्ञान होण्यासाठी पर्यावरणाचे महत्त्व आहे मानव आपल्या विकासासाठी निसर्गात ढ वळा ढवळ करत आहे त्याचा परिणाम परिणाम म्हणून पर्यावरणाची गुणवत्ता ढासळत असून पर्यावरणाची अवनीती होत आहे त्याची दुष्परिणाम संपूर्ण जग भोगत आहे याविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करून पर्यावरणाचा ऱ्हास कसा थांबवता येऊ शकेल याचे मार्गदर्शन करून या पर्यावरण संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग वाढविणे त्यांना वेगवेगळ्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व पर्यावरणाचे ज्ञान उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज ग्रामीण भागामध्ये कृषी विभागाकडून पर्यावरण जनजागृती विषयक काही मेळावे घेतली जातात ;माती परीक्षणाविषयी: किंवा रोग नियंत्रणाविषयी काही मार्गदर्शन केले जाते परंतु त्यामध्ये शेतकऱ्यांचा अतिशय अल्प सहभाग असल्याचे दिसून आले कारण आज ग्रामीण भागात अतिशय गंभीर स्वरूपाची समस्या म्हणजे तणनाशक तणनाशकामध्ये Round of; टू फोर्टी; मीरा 71 इत्यादी सारखे भयंकर औषध आलेले आहेत ; परंतु याचा वापर कसा करावा ;किती प्रमाणात करावा याविषयीचे मार्गदर्शन होताना दिसून येत नाही त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास हे कारणीभूत कारणीभूत ठरते.

मानवाच्या अतिरिक्त हस्तक्षेपामुळे विविध प्रकारचे प्रदूषण होत असून त्याचे परिणाम अतिशय गंभीर सजीव सृष्टीवर होताना दिसून येतात या प्रदूषणाची कारणे काय त्याचा समाजावर परिणाम कसा

VOL- IX ISSUE- VIII AUGUST 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

होतो व प्रदूषणाच्या प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना करावी लागेल करावी यासाठी प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य काय आहे याविषयीची सखोल माहिती ती करून देणे हे गरजेचे आहे. आजही प्रदूषण करणाऱ्या कोणकोणत्या गोष्टी आहेत प्रदूषण करणाऱ्या वस्तूंना पर्यायी वस्तू कोणती आहेत प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या वस्तूचा त्या करणे किती गरजेचे आहे .मानव वापरत असलेल्या अनेक वस्तू निरुपयोगी झाल्यावर फेकून दिल्या जातात अशा वस्तू मुळे पर्यावरणावर कसा परिणाम होतो फेकून दिलेल्या प्लॅस्टिक पिशव्यामुळे जनावर त्याचा कसा परिणाम होतो याविषयीची माहिती माहिती देणे गरजेचे आहे ;कारण आज प्रत्यक्ष ग्रामीण भागात अनेक जनावरांच्या पोटात तीस ते पन्नास किलो प्लास्टिक निघते ही बाब अतिशय गंभीर आहे. पृथ्वीवर जीव जन्माला येतो त्या प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे ही भावना मानवी मनात रुजवून जगा जगू द्या हा संदेश साऱ्या जगात पोहोचविणे आणि पर्यावरणाचे महत्त्व वाढविणे ही आज काळाची गरज बनलेली आहे. प्रत्यक्ष असे दिसून येते की आजही समाजामध्ये प्लास्टिक निघते म्हणून ह्या प्लॅस्टिकचे परिणाम किती गंभीर आहेत याची जाणीव जनसामान्याला करून देणे गरजेचे आहे. पर्यावरणाविषयी जोडी जाणीव जागृती असायला पाहिजे त्या प्रमाणामध्ये जाणीव जागृती नाही म्हणून पर्यावरण संवर्धनामध्ये समाजाची भूमिका ही अतिशय महत्त्वाची आहे.मानव व निसर्ग परस्पर पूरक असून निसर्ग मानवाला अनेक संधी प्राप्त. या संधीचा फायदा मानवाने पर्यावरणाच्या चौकटीत राहून घ्यावा अन्यथा मानवाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते याची जाणीव झाल्यामुळेच जगातील बहुसंख्य देश एकाच व्यासपीठावर येऊन पर्यावरण गुणवत्ता टिकून ठेवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करत आहेत यातून विश्वबंधुताची भावना वाढीस लागत आहे याची जाणीव जागृती समाजात झाली पाहिजे. पर्यावरण संवर्धनाच समाजाची भूमिका या विषयाचे समाजशास्त्री दृष्टिकोनातून अध्ययन होणे. करून पर्यावरणाचे वास्तविक कारणे व त्यामध्ये सहभागी विविध संस्था शासनाचे विविध कार्यक्रम इत्यादीचा सहभाग जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने या विषयाचे अध्ययन होणे गरजेचे आहे .

**संदर्भ**


१) डॉ.सुरेश फुले 'पर्यावरण अभ्यास 'विद्याभारती प्रकाशन लातूर.

२) डॉ.देवसरकर डॉ. दे.वा. कल्याणकर प्रा .सी. व्ही. 'पर्यावरण शास्त्र 'श्री राजलक्ष्मी प्रकाशन औरंगाबाद.

३) देशमुख श्रीपाद पर्यावरणाची ओळख अक्षय प्रकाशन पुणे.

४) Introduction to Environmental science youtub://